# ‘वायसीएम’मध्ये औषधटंचाईबाबत पुरवठादार, उत्पादक कंपनी ‘ब्लॅक लिस्ट’

## भाजपा नगरसेवक माऊली जगताप यांच्या पाठपुराव्याला यश; आरोग्य विभागाकडून लेखी कबुली

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती अर्थात वायसीएम रुग्णालयात काही काळ औषधांची कमतरता होती आणि त्यामुळे काही रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास सांगितले जात होते, अशी स्पष्ट कबुली पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिली आहे. औषधांच्या गुणवत्तेबाबत प्रतिकूल अहवाल आल्यानंतर एका पुरवठादाराचा पुरवठा थांबविण्यात आला. तसेच, उत्पादक कंपनीला काळ्या यादी टाकण्यात आले आहे. पर्यायी पुरवठ्याच्या प्रक्रियेदरम्यान तुटवडा निर्माण झाल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.  सध्या मात्र औषधपुरवठा सुरळीत असल्याचा दावा विभागाने केला आहे.**




नगरसेवक ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली बट्टूराव जगताप यांनी वायसीएममधील औषधांच्या कमतरतेबाबत २२ सप्टेंबर २०२६ रोजी पत्र दिले होते. त्याला आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे यांनी १६ ऑक्टोबर २०२६ रोजी लेखी उत्तर देत औषधसाठा, खरेदी, वितरण आणि पुरवठादारांवरील कारवाईचा खुलासा केला आहे.

अन्न व औषध प्रशासनामार्फत झालेल्या तपासणीत एका निविदाधारकाने पुरविलेली काही औषधे प्रमाणित गुणवत्तेची नसल्याचा अहवाल प्राप्त झाला होता. त्यानंतर संबंधित पुरवठादारावर प्रतिबंध घालण्यात आले आणि औषध उत्पादक कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात आल्याचे पत्रात नमूद आहे.

संबंधित पुरवठादार महापालिकेच्या रुग्णालयांना २३९ प्रकारची औषधे पुरवत होता. त्याच्याकडून नियमित लागणाऱ्या ७० ते ८० औषधांचा पुरवठा अचानक थांबल्याने पर्यायी व्यवस्था करावी लागली. निविदेतील पुढील पात्र निविदाधारकांना आदेश दिल्यानंतर पुरवठ्यासाठी अटींनुसार ३० दिवसांची मुदत असल्यामुळे दोन ते तीन आठवडे काही औषधांची कमतरता निर्माण झाल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे, तसे लेखी उत्तर आरोग्य विभागाचे प्रमुख लक्ष्मण गोफणे यांच्या स्वाक्षरीने दिले आहे.

औषधटंचाईच्या काळात काही रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास सांगितले जात होते, ही वस्तुस्थिती असल्याचे आरोग्य विभागाने लेखी उत्तरात मान्य केले आहे. याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या असून उपलब्ध औषधांमधून उपचार देण्यास सांगण्यात आले आहे. महापालिकेच्या निविदेतील औषधयादीत समाविष्ट औषधेच लिहून देण्याच्या सूचना वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिल्याचेही पत्रात म्हटले आहे. मात्र, अत्यंत गंभीर रुग्णांना विशेष उपचारासाठी तातडीने आवश्यक असलेली आणि निविदेत नसलेली औषधे अपवादात्मक परिस्थितीत लिहून देणे वैद्यकीयदृष्ट्या आवश्यक ठरते, असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

### विलंब करणाऱ्या पुरवठादारांकडून दंडवसुली

काही पुरवठादारांकडून होणाऱ्या विलंबाबाबत कारणे दाखवा नोटिसा बजावून निविदेतील अटींनुसार दंड वसूल करण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीमुळे औषधांच्या कच्च्या मालाचा तुटवडा आणि दरवाढ झाल्याने पुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे कारणही पत्रात नमूद करण्यात आले आहे. औषधांच्या नियमित खरेदीसाठी २१ निविदाधारकांकडून ६२६ प्रकारची औषधे घेतली जातात. तातडीच्या खरेदीसाठी स्वतंत्र तीन निविदाधारकांची व्यवस्था असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

### तक्रार निवारणासाठी मदत कक्ष प्रस्तावित

वायसीएमसह महापालिकेच्या रुग्णालयांतील उपलब्ध औषधांची अद्ययावत यादी वैद्यकीय अधिकाऱ्यांना संगणकीय व भौतिक स्वरूपात दिली जाते. मध्यवर्ती औषध भांडारातील साठा ‘एसएपी’ प्रणालीद्वारे संबंधित फार्मासिस्टना पाहता येतो, असे प्रशासनाने नमूद केले आहे. औषध वितरणाबाबत अडचण आल्यास रुग्णांनी रुग्णालयप्रमुख किंवा औषध वितरण विभागातील फार्मासिस्टशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सर्व रुग्णालयांच्या स्तरावर कै. लक्ष्मणभाऊ पांडुरंग जगताप मदत कक्ष सुरू करण्याचे प्रस्तावित असल्याची माहितीही पत्रात देण्यात आली आहे. दरम्यान, सध्या सर्व रुग्णालयांत पुरेसा औषधसाठा असून भविष्यात तुटवडा भासू नये यासाठी खबरदारी घेतली जात असल्याचे आश्वासन आरोग्य विभागाने दिले आहे.

> “ वायसीएममध्ये औषधटंचाई होती आणि काही रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करावी लागली, हे प्रशासनानेच लेखी मान्य केले आहे. महापालिकेच्या रुग्णालयात येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांवर औषधखरेदीचा अतिरिक्त भार पडणे योग्य नाही. पुरवठ्यातील त्रुटींची जबाबदारी निश्चित करून दर्जेदार औषधांचा अखंडित पुरवठा सुनिश्चित करावा. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते की नाही, याचा मी आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने पाठपुरावा करणार आहे.
>
> **- ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली जगताप, नगरसेवक, भाजपा.**

# डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस अभियांत्रिकी महाविद्यालयात पहिली इंटरनॅशनल कॉन्फरन्स

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस अभियांत्रिकी महाविद्यालय, वऱ्हाळे, तळेगाव येथे एमसीए विभागाच्या वतीने ‘इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन आर्टिफिशियल इंटेलिजन्स, क्लाउड कम्प्युटिंग अँड इमर्जिंग ट्रेंड्स इन रिसर्च, इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजीज (आयसीएआयसीईटी २०२६)’ या इंटरनॅशनल कॉन्फरन्सचे २३ व २४ ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या इतिहासातील पहिल्या या कॉन्फरन्सला संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**




महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. सुशांत पाटील आणि सीईओ अ‍ॅड. अनुजा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, प्राचार्य तथा परिषदेचे अध्यक्ष डॉ. एस. डी. शिरबहादुरकर यांच्या अध्यक्षतेखाली परिषद पार पडली. शैक्षणिक अधिष्ठाता तथा कार्यक्रमाचे सेक्रेटरी डॉ. योगेश गुरव यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली कार्यक्रमाला दिशा मिळाली. कीनोट स्पीकर डॉ. संदीप पांडे, परिषदेचे संयोजक तथा एमसीए विभागप्रमुख प्रा. मनीष राऊत, रजिस्ट्रार श्री. नामदेव वेताळे, संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. श्यामसुंदर कोसबटवार आणि सेशन चेअर डॉ. नवनाथ काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. मनीष राऊत यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कॉन्फरन्सच्या नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंतची धुरा त्यांनी समर्थपणे सांभाळली. संशोधकांशी समन्वय, संशोधन निबंधांचे संकलन, विविध सत्रांचे नियोजन आणि आयोजनाच्या विविध बाबींचे व्यवस्थापन करत त्यांनी कॉन्फरन्सला आकार दिला.

परिषदेसाठी १५० हून अधिक संशोधन निबंध प्राप्त झाले. त्यापैकी १०० हून अधिक निबंध स्वीकारण्यात आले, तर ६० हून अधिक निबंधांची नोंदणी झाली. २३ ऑक्टोबर रोजी प्रत्यक्ष, तर २४ ऑक्टोबर रोजी ऑनलाइन सत्रे पार पडली. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, क्लाउड कम्प्युटिंग, रिसर्च, इनोव्हेशन आणि इमर्जिंग टेक्नॉलॉजीज यातील बदलत्या प्रवाहांवर तज्ज्ञांनी विचारमंथन केले.

कॉन्फरन्सचे सूत्रसंचालन प्राध्यापक सृष्टी हिंगे आणि अनुराधा बोबडे यांनी केले. कॉन्फरन्सच्या आयोजनासाठी प्राध्यापक गोपाल टोंचर, डॉ. व्यंकट माने, प्रशांत राऊत, सुयश काकडे, आकाश गायकवाड, मुस्कान नायकवाडी, मोहन शिंगाडे, निखिल लाडे, अमोल नरवाडे तसेच सर्व विभागप्रमुखांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या नियोजनबद्ध सहभाग आणि प्रभावी समन्वयामुळे कॉन्फरन्स यशस्वीपणे पार पडली.

आयसीएआयसीईटी २०२६च्या यशस्वी आयोजनामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधन आणि नवोन्मेष क्षेत्रातील वाटचालीला नवी दिशा मिळाली असून, संस्थेच्या इतिहासातील ही पहिली इंटरनॅशनल कॉन्फरन्स महत्त्वपूर्ण टप्पा ठरली आहे.